# प्रेस नोट

दिनांक २७/१०/२०२१

**आरोपी लोकसेवीका डॉ. स्नेहंका महेंद्र बोधनकर, वय ३२ वर्षे, पद– पशुधन विकास अधिकारी, वर्ग–१, नेमणुक– पशु वैद्यकीय दवाखाना अंधोरी, ता. अहमदपुर, जि. लातुर यांनी १५००/–रूपये लाचेची मागणी करून लाच स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांना त्यांचे त्यांच्या आजारी मेंढयावर उपचार करण्यासाठी अंधोरी गावातील पशु वैद्यकीय दवाखान्यामध्ये तेथील डॉ. बोधनकर पशुधन विकास अधिकारी यांनी मेंढयाची तपासणी करून, उपचार करून पुढील उपचारादरम्यान मदत करण्यासाठी तक्रारदार यांनी अदा केलेल्या शासकीय फी व्यतिरीक्त ३०००/–रूपये लाचेची मागणी केली. तक्रारदार यांनी दक्षता जनजागृती सप्ताहच्या अनुषंगाने विवीध ठिकाणी प्रसारित करण्यात आलेल्या ला.प्र.वि.लातुर च्या संपर्क क्रमांका आधारे दिनांक २६/१०/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर या कार्यालयाकडे तक्रार प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दिनांक २७/१०/२०२१ रोजी १०.३७ वा पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवीका डॉ. स्नेहंका बोधनकर यांनी तक्रारदार यांच्या मेंढयाची तपासणी करून, उपचार करून पुढील उपचारादरम्यान मदत करण्यासाठी "तुम्हाला जे योग्य वाटल ते द्या" असे म्हणुन लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आरोपी लोकसेवीका डॉ. स्नेहंका बोधनकर यांनी तक्रारदार यांना "तुम्हाला जे योग्य वाटल ते द्या" असे म्हणल्याने लाच मागणीच्या रक्कमेबाबत निश्चित बोध होत नसल्यामुळे तक्रारदार यांच्याकडे उपलब्ध असलेल्या रक्कमे प्रमाणे सर्वानुमते १५००/–रूपये डॉ. बोधनकर यांना लाच देण्याचे ठरले. लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदार यांना दिनांक २७/१०/२०२१ रोजी पशु वैद्यकीय दवाखाना अंधोरी येथील कार्यालयात पाठविले असता आरोपी लोकसेवीका डॉ. स्नेहंका बोधनकर यांनी सापळा कार्यवाहीतील पंचा समक्ष लाचेची रक्कम १५००/–रूपये १२.२६ वाजता पशु वैद्यकीय दवाखाना अंधोरी येथील कार्यालय येथे स्वत: स्विकारली आहे म्हणुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

तक्रारदार यांनी आरोपी लोकसेवीका यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन किनगाव येथे कलम ७ ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हाचा तपास पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक पंडीत रेजितवाड, सपोउपनि संजय पस्तापुरे, पोह/चाटे, दामटे, कठारे, पोना/संतोष गिरी, मपोना/शिवकांता शेळके, पोना/अमर वाघमारे, पोका/शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, संदीप जाधव, दिपक कलवले, मपोशि रुपाली भोसले, पोका/मंगेश कोंडारे, गजानन जाधव, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा.श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र | :– | मोबाईल क्रमांक ८८८८८४१९६५ |
| २) | पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधिक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९३०९३४८१८४ |
| ३) | टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक | :– | १०६४ |
| ४) | कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ५) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :– | www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned with CamScanner